MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- LVIII, 23 March 2022

# जागतिक स्त्रीवाद आणि मराठी साहित्य



* मुख्यसंपादक *

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

* संपादक *

डॉ. अनिल मुंढे

* सहसंपादक *

डॉ. मारोती कसाब

PRINCIPAL
Shivaji College, HINGO

## Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

SHIVAJI COLLEGE HINGOLI

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor: 7 . 479*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

Vol. I ISSUE – LVIII Year – 6 23 March 2022

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर व्दारा संचलित

## महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर (महाराष्ट्र)

(एक दिवशीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र)

# जागतिक स्त्रीवाद आणि मराठी साहित्य

:: मुख्यसंपादक ::

**प्राचार्य डॉ. वसंत बिरादार**

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

:: संपादक ::

**डॉ. अनिल मुंढे**

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

:: सहसंपादक ::

**डॉ. मारोती कसाब**

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

**Address for Correspondence**

**Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)

**Website: www.wiidrj.com**

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India - Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com umbarkar.rajesh@yahoo.com

**Mob. No: +91-9623979067**

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

# INDEX



| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| ०१. | आदर्श व्यक्तिमत्त्वाचा शोध : युगस्त्री फातिमाबी शेख | डॉ. शेषराव नाईकवाडे | ०१ |
| ०२. | अरुणा ढेरे यांच्या कवितेतील स्त्रीवादी जाणिवा | सुचित्रा अशोक मदाने | ०४ |
| ०३. | स्त्रीवादः संकल्पना व स्वरुप | पंडीत नाना लहाने | ०८ |
| ०४. | मराठी कथा - कादंबऱ्यांतून प्रकट झालेला स्त्रीवाद | बाबासाहेब पांडुरंग लबडे<br>प्रा. डॉ. सविता खोकले | १२ |
| ०५. | मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद | डॉ. रंदिल गर्जेंद्र साहेबराव | १६ |
| ०६. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | दीपक शिवदास पाटील<br>डॉ. शशिकांत पाटील | २० |
| ०७. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले | डॉ. रामकिशन दहिफळे | २३ |
| ०८. | आदिवासी कवितेतील स्त्रीजीवन | डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर | २५ |
| ०९. | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून व्यक्त झालेला स्त्रीवाद | डॉ. श्रीहरी दासू चव्हाण | ३२ |
| १०. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | डॉ. सुभाष भगवान देशमुख | ३५ |
| ११. | स्त्रीवाद : संकल्पना व स्वरुप | डॉ. गणपती जोतीबा मोरे | ३७ |
| १२. | स्त्रीमुक्ती चळवळ आणि स्त्रीवादी साहित्य | डॉ. डी. के. आहेर | ३९ |
| १३. | प्रेमा कंटक यांचे कादंबरी लेखन | डॉ. विजय गणपतराव वारकड | ४१ |
| १४. | महात्मा जोतीराव फुले यांचा स्त्री विषयक दृष्टिकोन | डॉ. गोविंद काळे | ४३ |
| १५. | मराठी स्त्री ओवीगीतांतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद | प्रा. बबन अण्णासाहेब गित्ते | ४७ |
| १६. | मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद : विशेष संदर्भ - 'तारी' | डॉ. ललिता सत्यनारायण आय्या | ५१ |
| १७. | भारतीय स्त्री वादाच्या प्रणेत्या : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | डॉ. दत्तात्रय बाळासाहेब वेलजाळी | ५९ |
| १८. | स्त्रीवाद : संकल्पना व स्वरुप | सुभाष हासाजी डोंगरे | ६४ |
| १९. | गौरी देशपांडे यांच्या साहित्यातून येणारा स्त्रीवाद | सविता भिवा धनवडे | ६६ |
| २०. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | प्रा. नवनाथ निवृत्ती बेंडे | ६९ |
| २१. | मधु सावंत यांच्या कादंबरीतील राजकीय व सामाजिक स्त्री अस्तित्वाचा लढा | डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे | ७२ |
| २२. | कवितेतील स्त्रीचे आत्मभान | प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे | ७६ |
| २३. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | प्रा. राजकुमार मोरे | ७९ |
| २४. | स्त्रीवाद : संकल्पना व स्वरुप | स्नेहा व्यंकटराव वाघमारे | ८२ |
| २५. | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतील स्त्रीवाद | डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर | ८५ |
| २६. | सत्यशोधक ताराबाई शिंदे यांच्या साहित्यातील स्त्रीवाद | अक्षय बालाजी रत्नपारखे | ८८ |
| २७. | मराठी आदिवासी कवयित्रींच्या काव्यातील स्त्रीवाद | प्रा. डॉ. राजकुमार मुसणे | ९३ |
| २८. | सत्यशोधक ताराबाई शिंदे यांच्या साहित्यातील स्त्रीवाद | डॉ. मथुरा मेवाड | ९९ |
| २९. | मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्री आणि आव्हाने : चित्रा | संतोष मारोती चमकुरे | १०२ |





PRINCIPAL
Shivaji College, HING

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# कवितेतील स्त्रीचे आत्मभान

प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे

मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

साहित्यातील कविता हा साहित्यप्रकार आत्माविष्कार करण्यासाठी अतिशय प्रभावी असा प्रकार आहे. निरक्षर स्त्री पासून ते उच्चशिक्षित स्त्री पर्यंत कविता हे प्रभावी माध्यम आहे.

आधुनिक कालखंडात शिक्षण, स्वातंत्र्य, कायदा, प्रसारमाध्यमे, संधीची समानता या गोष्टीमुळे तसेच स्त्रीवादी जाणीव असल्यामुळे पाश्चात्य साहित्य स्त्री चळवळ, स्त्री हक्क कायदे संघटनायाची जाणीव होऊ लागल्यावर स्त्रियांनी ही आपल्या आत्मभानाला उघडउघड बाट करून दिली. काव्यफुले या काव्यात सावित्रीबाई लिहितात,

"अभिमानाने जगण्यासाठी शिकूनघ्या, जा शाळेला
मनुष्याचा खरा दागिना शिक्षण आहे, घ्या चला
जा शाळेला, जा शाळेला
काम पहिलं शिकायचं आहे, दुसरं काम खेळखेळा
जमेल तेव्हा झाडणं पुसणं, हात लावा घरकामाला
जा आधी जा शाळेला"१

शिक्षण म्हणजे आत्मभान जागृत करण्याचा सुवर्णमार्ग आहे.. त्यामुळे ही स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देते. आधी शिका, नंतर खेळा व शेवटी घरकाम करा ही त्रिसूत्री त्या स्त्रियांना सांगतात. शिक्षणातून आत्मभानाची निर्मिती होते. नीरजा लिहितात,

आता उघडायलाच हवेत । सारे झरोकेघराचे ।
ओल्या मातीचा सुगंध। श्वासात साठवताना।
आता ह्या खिडक्यांना । पडदे लावून शोभिवंत।
मी लपवणार नाही । माझे जडावेलश्वास ।
की झुगारणारही नाही । पहाटवेड्या वाऱ्याचा ।
मोकळा ओला स्पर्श"२

स्त्रीला संस्कृतीच्या पाशात गुरफटून ठेवल्यामुळे तिला जगने असह्य झाले. या संस्कृतीमध्ये उलथापालथ झाली. स्त्रीवादी जाणीवा, चळवळी, कायदा, स्त्रीहक्क, स्त्री आरक्षण, शिक्षण या मंथनातून आपण एक माणूस आहोत. एक माणूस एक मूल्य या विचारातून स्त्रीला स्वभान आले. तिने आपल्यावरी अत्याचाराला आव्हान दिले. मनातील विचारांना शब्दरूप द्यायचे आहे. कारण तिचा श्वास गुदमरतो आहे. मनाचे बाह्यरूपी पडदे म्हणजेच स्त्रीत्वाच्या नावाखाली तिला बंदीस्त केले ते पाश झुगारून देते आहे. नीरजा कवितेतून लिहीतात,

"तिने सारी कवाडे । मोकळी केली ।
वर्षानुवर्षाच्या बिजागरातून । तेव्हापासून ।
आभाळ तिच्या घरात । अविरत बागडतेय ।
अन् समुद्र ही अनुभवतोय । तिच्या पायांचा
मोकळा स्पर्श ।"३

स्त्रीला जेव्हा आत्मभान आले तेव्हा तिला आपल्या भोवतीचे पुरूषी वर्चस्वाचे पाश तोडून टाकले जे वर्षानु वर्षा पासून तिच्या भोवती आवळलेले होते. तेव्हापासून जणू तिला आभाळा प्रमाणे मोकळं वाटू लागलेलं आहे. ती मुक्तपणे बागते आहे. तिच्यात हा बदल आत्मभानातून निर्माण झालेला आहे. डॉ. सीमा साखरे लिहितात,

"जीर्णमूल्ये बदलून या चौकटीलाच काठाच माडीत
जीवघेण्या कोंडमाऱ्यातून सुटका होईल निश्चित "४

समाजामध्ये अनेक विघातक मूल्ये दिसून येतात. ती मूल्ये स्त्रियांची गळचेपी करणारी, तिला पारतंत्र्यात टाकणारी आहेत. सणासभारंभातील स्त्री जाचक प्रथा, उपास-तापास, हुंडा, विधीव्रत, सतीप्रथा, मारझोड, सासूरवास अशा जीर्णप्रथा मोडून काढून त्यातून स्त्रीला मुक्त करण्याची गरज व्यक्त होते. हेच आत्मभान, स्त्रीला झालेले आहे. संजीवनी तडेगावकर लिहितात,

"आईत खाऊ नवऱ्याला

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

कमवणाऱ्या बायकोने
धक्के देऊन घराबाहेर काढले"५

स्त्रीने कष्ट करावे. नवऱ्याने आयते खाऊन तिला बोल लावणे, दारू पिणे, बाहेरख्याली करणे अशा नवऱ्याच्या वागण्याला स्त्रिया कदरून जातात व वेळ येताच त्या त्याला घरातून हाकलतात. ह्या स्त्रिया आता शिकलेल्या आहेत. स्त्री-पुरूष समानता जाणणाऱ्या आहेत. स्वतःच्या पायावर उभारलेल्या आहेत. पूर्वपरंपरेने केलेला अन्याय त्या सहन करत नाहीत हे सहन न करण्याचे आत्मभान त्यांना आलेले आहे. मलिका अमर शेख म्हणतात,

"कुठलीच मुक्ती मुक्तता करत नाही तुमची
कुठलाच मोक्ष देत नाही साक्षात्कार अखेरचा
कुठलचं स्वातंत्र्य देत नाही अस्सल माणूसपण"६

आज स्त्रीमुक्तीचा नारा पिटला जातो. मात्र कागदांच भिडोळ्यातीय योजना, उपक्रम, भाषणे, चर्चा, आरक्षण, नोकरी, मेळाव अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती, पुरस्कार अशा बाह्य सोपस्कार पुरतेचे सगळे चित्र चालले दिसून येते. स्त्री ही आजही मुक्त आहे का? असा प्रश्न विचारला असता उत्तर येण्याची शक्यता कितपत आहे? हाच प्रश्न उभा राहतो. म्हणूनच कवयित्री कोणतीच मुक्ती तिला मुक्ती देऊ शकत नाही. हे आत्मभान स्त्रीला आलेले आहे. यासंदर्भाने अनुराधा पाटील लिहितात,

"मला नको आहे तुझं अबीर बुक्क्याचं पंढरपूर नको आहे जन्मोजन्मी पडणारा मुक्तीचा श्रीरंग चकवा"७

भारतीय संस्कृतीमध्ये विवाह संस्कार महत्त्वपूर्ण मानला जातो. जो मानव मरतो तो विवाहीत असेल तरच त्याच्या आत्म्याला मुक्ती मिळते. म्हणून विवाह न होताच मरण पावलेल्या व्यक्तीचे लग्न मेल्यावर लावले जाते. ही आत्म्याच्या मुक्तीची युक्ती अवलंबली जाते. स्त्री विवाहीत होते तेव्हा कपाळी, भांगामध्ये पातीव्रत्याचे लेणे म्हणून कुंकू लावले जाते. स्त्रीला हा विवाह हे सौभाग्य लेणं जणू मुक्ती मिळवून देतात असा समाजाचा समज झालेला आहे. परंतु खरे पाहता ही मुक्ती नसून स्त्रीला दुःखात लोटणारी विकृत संस्कृतीच वाटू लागते. म्हणूनच ही स्त्री या सर्वांना नाकारते, त्याचा धिक्कार करते आणि ती जन्मोजन्मी या मुक्तीच्या चकवा देणाऱ्या वर्तुळात, पाशामध्ये गुंतायचेच नाही याचा निश्चय करते. यातून स्त्रीचे आत्मभान जागृत झालेले दिसून येते.कवयित्री स्वाती शिंदे–पवार लिहीतात,

"खंबीर हो
या बुरसटलेल्या मानसिकतेशी
तुला संघर्ष करायचा आहे"८

कवयित्री स्त्रियांना खंबीरपणे वागण्यास सांगते. स्त्रिच्या अस्तित्त्वावर घाला घालणाऱ्या, तिच्यावर बळजबरी करणाऱ्या समाज व्यवस्थेशी तिला संघर्ष करण्यासाठी तयार राहण्यास सांगते. हे तिला झालेले आत्मभान आहे.छाया कोरेगावकर लिहीतात,

"माझा स्पर्शोत्सुक देह आता
होऊ पाहतोय मुक्त
सीमीत आदिबंधातून
रेखाटू पाहतोय स्वनिर्मित
अवकाशाच्या फळयावर
लिंगभेदा पलीकडची नवी बाराखडी"९

स्त्रीची ही मुक्त होण्याची जाणीव आहे. तिला स्वतःचे अवकाश निर्माण करून त्याखाली स्त्री-पुरूष अशा लिंगभेद निरपेक्ष जगण्याचा आनंद मिळवावयाचा आहे. स्त्रीही सीमीत आदि बंधगुंतली आहे. परंपरेच्या नावाखाली तिच्यावर लादले गेलेले खुळचट विचार नको आहेत. संध्या रंगारी लिहितात,

"ठरवून टाकलंय मी, इतरासाठी खूप जगून झालं
आता थोडं स्वत:साठी जगायचं, आपलं स्वतःचं
वेगळ जग निर्माण करायचं"१०

स्त्री इतरांसाठी झिजते, आपलं संपूर्ण जीवन इतरांना सुख समाधान देण्यासाठी व्यथीत करते. कोणीच तिच्या भावनांचा विचार करीत नाहीत. ती आयुष्यभर जळत राहते. याची जाणीव तिला जेव्हा होते तेव्हा मात्र ती मनामध्ये निश्चय करते, की आपण आता स्वत:साठी जगलं पाहिजे.स्वतःच जग निर्माण केलं पाहिजे माणूस हीच जात तिथे वावरत राहील असे जग ही स्त्री निर्माण करण्याचे ठरविते. हा विचार तिच्यातील आत्मभान जागृत करतो. प्रभा गणोरकर लिहितात,

"वणव्यातल्या झाडाने
स्वतःच्या मुलांकडून मदतीची अपेक्षा करू नये

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

असहायपणे जळत असताना मुलांनी हात आवरून घेतले असतात कठोरपणे माना फिरवून"११

स्त्री वणव्यात सापडलेली आहे.तिला कोणाचेही सहाय्य नाही. त्यास्त्रीने आपल्या मुलांकडून की ज्यांनी आपल्या माना फिरविल्या आहेत. मदत करायची नाही असे ठरविलेले आहे. त्यांच्या कडून काडीचीही मदत मागू नये. अशी ती म्हणते. या स्त्रीला आत्मभान आलेले आहे.

विनया गर्दे लिहितात,

"जीवंत मढे न बनता, स्वत्वाची तू चाळव धग

स्वतः स्वतःची बूज राखत, स्वतःसाठीही थोडी जग! १२

स्त्रीच्या ठिकाणी अपार शक्ती आहे. पुरूष प्रधान संस्कृतीत स्वतःचे कर्तृत्त्व, क्षमता, ऊर्जा यांना विसरलेली आहे. मग तिने हे विसरलेले आठवून, इतरांसाठी ती झिजलेली आहे. तिने इतरांची नातेभूख भागविली आहे. यात ती स्वतःत्वगमावून बसलीआहे. तिने आज स्वत:साठी जगलं पाहिजे, हे आत्मभान जागृत होते.डॉ. उर्मिला चाकूरकर लिहितात,

"चार दागिन्यांच्या सटेपेक्षा

मौलिक विचारांची जपणूक कर

समोरच्या नजरांनही कापरंभरेल"१३

स्त्रीला दागिन्यामुळेच आपला प्राण गमवावा लागतो, दागिन्यामुळेच त्यांच्या पारतंत्र्यात भर पडते. म्हणूनच ही कवयित्री म्हणते की, तूया दागिन्यांच्या लोभापेक्षा मुक्तीदायी विचारांची जर जपणूक केलीस तुला तुझ्या स्वातंत्र्याची जाणीव होईल. तुझे शोषण केले जाते याची जाणीव होईल. त्याचा परिणाम म्हणजे समोरच्या पुरूषसत्ताकतेला धडकी भरेल, त्यांच्या वाईट प्रवृत्तीला खिळ बसेल, असे आत्मभान निर्माण करते.

निष्कर्ष:-

स्त्रीवादी साहित्यात स्त्रियांनी मराठीतील वेगवेगळ्या साहित्य प्रकारात लेखन केले आहे. स्त्री जीवनातीलसुख दुःखाचा आलेख कादंबरी, कथा, कविता या साहित्य प्रकारातून ठळकपणे आढळून येते. कवितेतून समाजातील जाचक रूढी परंपरा समाजातील स्त्रिची सामाजिक सांस्कृतिक धार्मिक ठिकाणी जाचक वागणूक दिली जाते. शिक्षणाने जीवन समृद्ध होते. शिक्षण आत्मभान जागृत करण्याचे काम करते. सावित्रीबाई फुले यांनी सर्वप्रथम स्त्रीचे आत्मभान जागृत केले आहे. स्त्रीवर कुटुंबात, समाजात, धार्मिक कार्यात होत असलेले अन्याय थांबविण्यासाठी कवितेतून बंड करताना स्त्री दिसते.एकंदरीत कविता साहित्य प्रकारातून आत्मभान आलेली स्त्री दिसून येते.

संदर्भ:-


1. वैद्य सरोजिनी व संपादन मंडळ, स्त्री साहित्याचा मागोवा खंड-१, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००२, पृ.६२.
2. महाजन वंदना, स्त्रीवाद आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, २०१३, पृ.२१३
3. तत्रैव, उ.नि.पृ.२१२.
4. सरकटे सदाशिव, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०११, पृ.१६६.
5. तत्रैव, उ.नि.पृ.१५८.
6. महाजन वंदना, स्त्रीवाद आणि मराठी साहित्य,उ.नि.पृ.२०७
7. जाधव रा.ग., आधुनिक मराठी कवयित्रींची कविता प्रतिमा प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती, १९८६, पृ.१०५.
8. सरकटे,सदाशिव, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता,उ.नि.पृ.२३०.
9. भागवत वंदना व इतर संपादक संदर्भासहित स्त्रीवाद: स्त्रीवाद चर्चाविश्व, शब्द पब्लिकेशन, मुंबई, पहिली आवृत्ती, २०१४,पृ.५४९.
10. पाडगावकर कांचन, मराठवाड्यातील कवयित्रींची कविता, रुपवेध प्रकाशन,परभणी, प्रथमावृत्ती, २००७, पृ.११३
11. सरकटे सदाशिव, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता,उ.नि.पृ.१२०.
12. पाडगावकर कांचन, मराठवाड्यातील कवयित्रींची कविता,उ.नि.पृ.१९१
13. तत्रैव, उ.नि.पृ.१३०.


PRINCIPAL
Shivaji College,Hingoli
Tq & Dist.Hingoli (MS